# भारतीय क्रांतिकारी संघटनेतर्फे जनहितार्थ जाहीर भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध कायद्याने लढण्यास मार्गदर्शनपर लेख एकाच पेजवर पुढील लिंकप्रमाणे-

https://wp.me/P9WJa1-MV

मुख्य वेबसाईट- https://jaihindbks.com/



## सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ ऑक्टोबर २०१५.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक वशिअ. १११४/प्र.क्र.६०/११.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकानुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ (यात यापुढे मुख्य नियम असा उल्लेख करण्यात येईल) यांच्या नियम ३ उप-नियम (१) च्या खंड (तीन) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील, जसे :—

"(चार) संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व आणि लोकशाहीची मूल्ये यांच्याप्रती वचनबद्ध असेल ;

(पाच) भारताचे सार्वभौमत्व आणि एकात्मता, राज्याची सुरक्षितता, सार्वत्रिक सुव्यवस्था, सभ्यता आणि नैतिक मूल्ये यांचे रक्षण करील आणि त्यांचे प्रचालन करील ;

(सहा) उच्च नैतिक मानके आणि सचोटी बाळगावी ;

(सात) राजकीयदृष्ट्या तटस्थता ठेवावी ;

(आठ) कर्तव्य पार पाडीत असताना गुणवत्ता, औचित्य आणि निःपक्षपातीपणा या तत्त्वांचे अनुसरण करील ;

(नऊ) उत्तरदायित्व आणि पारदर्शकता ठेवील ;

(दहा) लोकांप्रती, विशेषतः दुर्बल घटकांप्रती प्रतिसादी असेल ;

(अकरा) लोकांप्रती सौजन्य आणि सद्वर्तन ठेवील ;

(बारा) केवळ, सार्वजनिक हिताचे निर्णय घेईल आणि सार्वजनिक साधनसंपत्तीचा कार्यक्षमतेने, परिणामकारकरीतीने आणि काटकसरीने वापर करील किंवा वापरण्यास लावेल.

(तेरा) त्याच्या सार्वजनिक कर्तव्याशी संबंधित कोणतेही खाजगी हित घोषित करील आणि कोणताही विरोध असल्यास, सार्वजनिक हित जपले जाईल अशा रीतीने तो मिटविण्यासाठी उपाय योजील ;

(चौदा) त्याला स्वतःला, त्याच्या कुटुंबाला किंवा त्याच्या मित्रांना आर्थिक वा भौतिक लाभ प्राप्त करून घेण्याच्या हेतूने स्वतःला कोणत्याही आर्थिक किंवा इतर आबंधनामध्ये गुंतवून ठेवणार नाही ;

(पंधरा) नागरी सेवक म्हणून त्याच्या पदाचा गैरवापर करणार नाही आणि त्याला, त्याच्या कुटुंबाला किंवा त्याच्या मित्रांना आर्थिक वा भौतिक लाभ मिळवून देतील, असे निर्णय घेणार नाही ;

(सोळा) फक्त गुणवत्तेनुसार निवड करील, निर्णय घेईल आणि शिफारस करील ;

(सतरा) औचित्यपूर्वक आणि निःपक्षपातीपणे कार्य करील आणि कोणाशीही विशेषतः समाजातील गरीब आणि वंचित घटकांशी भेदभाव करणार नाही ;

(अठरा) जे कोणत्याही कायद्याच्या, नियमांच्या, विनियमांच्या आणि प्रस्थापित प्रथेच्या विरूद्ध आहे किंवा असू शकते असे कोणतेही कृत्य करण्यापासून दूर राहील ;

(एकोणीस) त्याचे कर्तव्य पार पाडताना शिस्त राखील आणि त्याला यथोचितरित्या कळविण्यात आलेल्या कायदेशीर आदेशांचे पालन करण्यास जबाबदार असेल ;

(वीस) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे आपली पदीय कर्तव्य बजावत असताना, विशेष करून जी माहिती उघडकीस येण्याने भारताचे सार्वभौमत्व आणि एकात्मता, राज्याची सुरक्षितता, राज्याचे धोरणात्मक, वैज्ञानिक वा आर्थिक हितसंबंध, परराष्ट्रांशी असलेले मैत्रीपूर्ण संबंध यांवर बाधक परिणाम होऊ शकेल किंवा जी माहिती अपराधास चिथावणी देणारी असेल किंवा कोणत्याही व्यक्तीस बेकायदेशीर लाभ मिळवून देणारी असेल अशा माहितीच्या बाबतीत गोपनीयता बाळगण्यास जबाबदार असेल ;

(एकवीस) व्यावसायिकतेच्या उत्तम दर्जाने आणि त्याच्या सर्वोत्तम क्षमतांनुसार समर्पित होऊन त्याची कर्तव्ये बजावील आणि पार पाडील ".

भारतीय क्रांतिकारी संघटनेतर्फे जनहितार्थ जाहीर भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध कायद्याने लढण्यास मार्गदर्शनपर लेख एकाच पेजवर पुढील लिंकप्रमाणे-

https://wp.me/P9WJa1-MV

मुख्य वेबसाईट- https://jaihindbks.com/



३. मुख्य नियमांच्या नियम १२ मध्ये उप-नियम (२) च्या खंड (एक), (दोन) आणि (तीन) ऐवजी पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील, जसे :—

"(एक) गट "अ" चे कोणतेही पद धारण करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत पंचवीस हजार ;

(दोन) गट "ब" चे कोणतेही पद धारण करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत रुपये पंधरा हजार ;

(तीन) गट "क" चे कोणतेही पद धारण करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत रुपये सात हजार पाचशे."

४. मुख्य नियमांमधील नियम २२अ ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल, जसे :—

२२अ. कामकरी महिलांच्या लैंगिक छळवादास प्रतिबंध :—

(१) कोणताही शासकीय कर्मचारी कोणत्याही महिलेच्या कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवादाचे कोणतेही कृत्य करणार नाही.

(२) कामाच्या ठिकाणी प्रभारी असलेला प्रत्येक शासकीय कर्मचारी त्या कामाच्या ठिकाणी कोणत्याही महिलेच्या लैंगिक छळवादास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करील.

स्पष्टीकरण.—(एक) या नियमांच्या प्रयोजनार्थ,—

(अ) " लैंगिक छळवाद " यामध्ये खालीलपैकी एका किंवा अनेक कृत्यांचा वा वर्तणुकीचा समावेश (प्रत्यक्ष वा अन्यथा) जसे :—

(एक) शारीरिक संपर्क आणि कामोद्दीपक प्रणयचेष्टा ; किंवा

(दोन) लैंगिक सौख्याची मागणी अथवा विनंती ; किंवा

(तीन) लैंगिक वासना प्रेरित करणारे शेरे ; किंवा

(चार) कोणत्याही स्वरूपातील संभोग वर्णन/संभोग दर्शन/अश्लील साहित्याचे प्रदर्शन (Showing Pornography) ; किंवा

(पाच) कोणतेही अन्य अशोभनीय शारीरिक, तोंडी अथवा सांकेतिक आचरण.

(ब) याशिवाय खालील परिस्थिती ही लैंगिक छळवादाच्या कृती किंवा वर्तणुकीशी संबंधित उत्पन्न झाली असेल तर तो लैंगिक छळवाद मानला जाईल :—

(एक) तिच्या कामामध्ये विशेष वागणूक देण्याचे गर्भित किंवा स्पष्ट आश्वासन देणे ; किंवा

(दोन) तिच्या कामामध्ये हानीकारक वागणूक देण्याचे गर्भित किंवा स्पष्ट धमकी देणे ; किंवा

(तीन) तिच्या सध्याच्या किंवा भविष्यकालीन कामाचा दर्जा/स्थानाबाबत गर्भित किंवा स्पष्ट धमकी देणे ; किंवा

(चार) तिच्या कामामध्ये हस्तक्षेप करणे किंवा तिच्याकरिता दहशतीचे, क्षोभक व प्रतिकूल असे कामाचे वातावरण निर्माण करणे ; किंवा

(पाच) तिच्या स्वास्थ्यावर किंवा सुरक्षिततेवर परिणाम करणारी अपमानास्पद वागणूक देणे.

(क) " कामाचे ठिकाण " यामध्ये :—

(एक) कोणताही विभाग, संघटना, उपक्रम, उद्यम, आस्थापना, संस्था, कार्यालय, शाखा किंवा कक्ष (Unit) जे शासनाद्वारे स्थापित, त्याच्या अधिपत्याखालील, नियंत्रित किंवा शासनाद्वारे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या पूर्णतः किंवा अंशतः अनुदानित ;

(दोन) रुग्णालये किंवा शुश्रुषालये ;

(तीन) कोणतीही क्रीडासंस्था, प्रेक्षागार, क्रीडा संकुल तसेच स्पर्धा किंवा खेळाचे ठिकाण/स्थळ, जरी ते निवासीय असले आणि प्रशिक्षणासाठी, खेळांसाठी किंवा इतर कार्यक्रमांसाठी वापरले जात नसले तरीही ;

(चार) कामाच्या अनुषंगाने महिला कर्मचाऱ्याने भेट दिलेले कोणतेही ठिकाण ज्यात असा प्रवास करताना नियोक्त्याने उपलब्ध करून दिलेल्या वाहनाचाही समावेश असेल ;

(पाच) गृहस्थाचे ठिकाण किंवा घर " याचा समावेश होतो.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्यं. मा. भट,
शासनाचे उप सचिव.